# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

## अहवाल: “वाचन संकल्प महाराष्ट्राचा”

## (सामूहिक वाचन उपक्रम)

दि. ०१/०१/२०२५ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे **“वाचन संकल्प महाराष्ट्राचा”** या महत्वपूर्ण विषयावर **“सामूहिक वाचन उपक्रम”** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कोकण विभाग सहसंचालक (उच्च शिक्षण) मा. डॉ. विजय नारखेडे , मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले, सर्व प्राध्यापक वृंद आणि प्रथम व द्वितीय वर्षातील सर्व छात्राध्यापक उपस्थित होते.

सर्वप्रथम, कोकण विभाग सहसंचालक (उच्च शिक्षण) मा. डॉ. विजय नारखेडे व मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी फलकावरील फीत कापून सामूहिक वाचन उपक्रमाचे उद्घाटन केले. त्यानंतर, मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी कोकण विभाग सहसंचालक (उच्च शिक्षण) मा. डॉ. विजय नारखेडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांनी मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कोकण विभाग सहसंचालकव (उच्च शिक्षण) मा. डॉ. विजय नारखेडे यांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या विषयावर मार्गदर्शन केले. मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले तसेच सर्व प्राध्यापक वृंद आणि प्रथम व द्वितीय वर्षातील छात्राध्यापकांनी ग्रंथालयातून मिळालेल्या ग्रंथाचे वाचन केले.

हा उपक्रम दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधी मध्ये राबवला जाणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती. स्मितल कुरूप यांनी उत्कृष्टपणे पार पाडले.




कार्यक्रमाचे फलक लेखन.




फलकावरील फीत सोडून उद्घाटन करताना कोकण विभाग सहसंचालक मा. डॉ. विजय नारखेडे.




कोकण विभाग सहसंचालक मा. डॉ. विजय नारखेडे यांचे स्वागत करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले.




मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांचे स्वागत करताना प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार.




मार्गदर्शन करताना कोकण विभाग सहसंचालक मा. डॉ. विजय नारखेडे.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना श्रीमती. स्मितल कुरूप.




सामूहिक वाचन करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले तसेच सर्व प्राध्यापक वृंद आणि प्रथम व द्वितीय वर्षातील सर्व छात्राध्यापक.




आभार प्रदर्शन करताना श्रीमती. स्मितल कुरूप.